# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

द्वितीय सत्र परीक्षा 2019–20

विषय – मराठी

समय –3.00 घंटे | वर्ग – **9 (A,C,D,E,F,)** | गुण – 80

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

2) आकृत्या पेननेच काढाव्यात

स्वच्छता, निटनिटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन 'यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

प्रश्न 1ला अ पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा:


1) हिवाळयाच्या सुरवातीला या खंडातून भारतात पक्षी येतात. (1)

[ ] [ ]

2) पक्ष्यांच्या दुनियेतल्या अनेक गोष्टी आश्चर्यजनक आहेत; पण त्यातही सर्वांत स्तिमित करणारे काही असेल तर अनेक पक्षी-जाती वर्षातून दोनदा करत असलेला हजारो मैलांचा प्रवास. भारतातल्या कोणत्याही सरोवराकडे हिवाळ्याच्या सुरुवातीला नजर टाकली तर निरनिराळ्या जातींच्या बदकांनी पाणी अक्षरश: झाकलेले दिसते. हे पक्षी महिन्या दोन महिन्यांपूर्वी तर इथे नव्हते. एकदम हजारोंच्या संख्येने हे आले कुठून?

युरोप आणि उत्तर आशियातून हजारो मैलांचा प्रवास करून बदकेच नव्हे, तर इतरही असंख्य जातींचे पक्षी नियमितपणे हिवाळ्याच्या आरंभी येऊ लागतात. भारतात येणारे श्वेतबलाक जर्मनीतून येतात, तर बदकांच्या काही जाती सायबेरियातून. बलाकांच्या स्थलांतराविषयी कालिदासाच्या वाङ्मयात उल्लेख आढळतात. हंस पक्षीसुद्धा पावसाळ्यात दिसत नाहीत, अशी वर्णने प्राचीन वाङ्मयात आहेत. मात्र या काळात हे पक्षी नक्की कुठे जातात याची मात्र माहिती दिसत नाही.

याच्या उलट युरोपमध्ये अनेक पक्षी हिवाळ्यात दिसेनासे होतात याची जाणीव होती; पण ते नक्की काय करतात हे कुणालाच माहिती नव्हते. अनेकांच्या समजुतीप्रमाणे बर्फ पडू लागण्यापूर्वी हे पक्षी बेडूक, खवलेकरी अथवा काही सस्तन प्राण्यांप्रमाणे चिखलात अथवा कपारीत गाडून घेऊन प्रदीर्घ हिवाळी झोप काढत असले पाहिजेत. पुढे माणूस एका खंडातून दुसऱ्या खंडात प्रवास करू लागला तेव्हा त्याच्या लक्षात आले, की आपल्या खंडातून गायब होणारे पक्षी त्याच ऋतूत दुसऱ्या खंडात दिसून येतात.



2) (1)

भारतात येणारे पक्षी

- जर्मनी देशातून [ ]
- सायबेरिया देशातून [ ]

**कृती 21) कोष्ठके पूर्ण कराः** (1)

कालिदासाच्या | प्राचीन

उल्लेख – वाङःमयात – उल्लेख

[ ] [ ]

2) हिवाळयात भारतातील सरोवरे या पक्ष्यांनी झाकली जातात (1)

[ ]

**कृती 3)**

**1) पुढील शब्दांच्या विरूद्ध अर्थाचे शब्द उताऱ्यातून शोधून लिहाः** (1)

1) अर्वाचीन x ----------

2) सुलट x ------------

**कृती 4स्वमतः** **(3)**

हिवाळा, खंड व पदयांचे स्थलांतर यांचा संबंध तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**प्र. 1ला**

**कृती ब 1)** **खिडकीलगतच्या लिंबाच्या झाडाची वैशिष्टये** **(2)**

[ ] [ ] [ ] [ ]

मी राहत होतो त्या घराच्या मागं एक लिंबाचं झाड होतं. लिंब म्हणजे कडूलिंब नव्हे. आपण खातो त्या लिंबाचं झाड. खिडकीलगतच होतं ते काटेरी आणि लिंबाच्या फळांनी गच्च लगडलेलं असं. लसलशीत हिरवंगार आणि चैतन्यमय. प्रदेश सगळा उन्हाचा होता. त्या भागात एकूणच उन्हाळा जास्त, आसमंत तापून जाई. आसपासची जमीन तापून करपून तपकिरी पडलेली दिसे. जी काही झाडं आसपास होती ती मलूल आणि काळपट हिरवी दिसत आणि पाणथळ तर परिसरात कुठंच नव्हती. सगळीकडं शुष्क कोरडी जमीन. घरसुद्धा तापून निघे.या सगळ्या पार्श्वभूमीवर ते झाड म्हणजे विलक्षण जीवनमय आणि जीवनदायी वाटे.

खरं तर भिंतीच्या उंचीचे झालेलं लिंबाचे झाड म्हणजे भोवतालच्या सजीवांच्या दिलाशाचं केंद्र झालं होतं, हे माझ्या लक्षात आलं. त्या झाडाखाली 'काळीभोर सावली' असे. मोरीचं पाणी सगळं त्या झाडाला जाई. त्यामुळं जमिनीत नेमकी तिथंच ओल असे . त्या ओलसर जमिनीत मला काही शंख दिसू लागले. आज इथं दिसलेला शंख उद्या तिथं दिसे. रात्रीतून तो बराच सरकलेला असे. लहान-मोठे अनेक शंख मग दिसून येऊ लागले. मग लक्षात आलं, की या झाडाखाली गोगलगाईची वस्ती आहे. इतक्या मोठ्या आकाराच्या गोगलगाईची वस्ती मी प्रथमच पाहत होतो आणि प्रथमच मी असंही पाहिलं, की त्या गोगलगाई शंख पाठीवर घेऊन तर चालतातच; परंतु त्या झाडांवरही चढतात. फांदीवर चिकट रंगानं बरबटलेल्या गोगलगाई पाहणं, त्यांचा प्रवास निरखणं हा माझा आणि लहान मुलांचा कौतुकाचा कार्यक्रम होऊन बसला होता.



लवकरच एक पारव्याची जोडी त्या गर्द हिरव्या आश्चर्यात दिलासा शोधू लागली. त्या जोडीनं काड्याकाड्यांचं एक घरटं त्या लिंबाच्या काटेरी झाडात बांधायला सुरुवात केली. खिडकीतून किंवा दारातून हळूच पाहिलं, की गुंजांच्या डोळ्यांची, लुकलुकत्या नजरेची पारवी दृष्टीस पडे. भोवतालच्या रखरखीतून त्या जोडीनं एक थंड असा आश्रय शोधून काढला होता. माझा मुलगा तिथं वारंवार जाऊन पाही म्हणून मग ते जोडपं हळूहळू दिसेनासं झालं.

**कृती 2 कारणे लिहा.** **(1)**

1) पारव्याची जोडी लिंबाच्या झाडावर राहते कारण -----

**कृती 3 विशेषणे व विशेष्यांच्या जोडया लावाः** **(2)**

| उडते | थंड | दाक्षिणात्य | चिमुकल्या |
|---|---|---|---|
| सावली | पऱ्या | कीटक | स्त्री |

**कृती 4 स्वमतः** (3)

झाड हे जीवनदायी केंद्र बनू शकते ही संकल्पना तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

**प्र. 1 ला क) पुढील अपठित उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.**

**1) कोष्ठके पूर्ण कराः** **(2)**

**संवादातील घटक**

**अपठित उतारा क्र. २ : (सरावासाठी)**

'संवाद' हे दोन जिवांना जोडणारे अत्यंत प्रभावी साधन आहे. संवाद साधण्याची कला माणसालाच अवगत आहे. संवादात शब्द असतात, भावना असतात, भावनांचे पाझर असतात, प्रहार असतात. आपण लहान मुलांपासून ते वरिष्ठांपर्यंत अनेकांशी संवाद साधत असतो. प्रसंगपरत्वे, व्यक्तीपरत्वे संवादातील शब्दांची लय बदलत असते. संवादातील शब्दाच्या पाठीमागे ते उच्चारणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व उभे असते. अगदी फोनवरून 'हॅलो' उच्चारताना काही माणसं असा लांबलचक सूर आळवतात की, ऐकणाऱ्याला हसू येते; किंवा काही माणसं अशा दांडग्या आवाजात प्रतिसाद देतात की, शेजारच्याला वाटते, याने फोन बाजूला करून संभाषण केले तरी फोन करणाऱ्याला ते थेट ऐकू जाईल. 'शब्द' ही मुळातच एक विलक्षण शक्ती आहे. त्यात उत्कटता असते, भव्यता असते, सौंदर्य असते.

**प्र. 1 ला क**

**2) आकृतिबंध पूर्ण कराः** **(1)**

**फोनवरून संवाद साधण्याचे विशेष**

**3) चौकटी पूर्ण करा** **(1)**

1) संवाद साधन्याची कला फक्त यालाच येते

2) दोन जिवांना जोडणारे प्रभावी साधन

**पदय**

**प्र. 2 1) कृती आकृती पूर्ण कराः** (2)

**कवितेतील घटकांच्या कृती लिहाः**

वीज

पाऊस

***

पुन्हा एकदा
चमकाची वीज
उतरावी खाली
भिनावी रक्तात
पेटावे स्नायू
करीत पुकार
पुन्हा एकवाद
पुन्हा एकदा
घालीत पिंगा
पावसाच्या सरी
व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली
मातीत माती
व्हावी एक...
पुसून टाकीत
भेदाभेद...
पुन्हा एकवेळ...

पुन्हा एकदा
घुमाचा वारा
युवक इथला
भारला जावा
भुलावी तहान
विसरावी भूक
नवनिर्माणाची
लागावी चाहूल
उजळावी भूमी...
दिगंतात...
पुन्हा एकदा...

**कृती 2) ब कवयित्रीला असे का म्हणावेसे वाटते ?** **(1)**

1) पावसाच्या सरी कोसळाव्यात : कारण ––––––

**2) चौकटी पूर्ण कराः** **(1)**

चमकणारी – [ ]

कोसळणाऱ्या – [ ]

**कृती 3 1) पुढील वाक्यातील अव्यय व प्रकार ओळखाः** **(1)**

पुन्हा एकदा वीज चमकावी.

**2) गटात न बसणारा शब्द लिहाः** **(1)**

1) आकाश, गगन, सदन, नभ, अंबर

**कृती 4 कवितेचा तुम्हाला समजलेला भावार्थ आपल्या भाषेत स्पष्ट करा.** **(2)**

**प्र. 2रा ब पुढील पैकी कोणत्याही एका कवितेचे रसग्रहण करा**

अ) उजाड उघडे माळरानही

आ) तिफन

1) कवी/कवयित्री कोण? (1)
2) कवितेचा संदर्भ लिहा. (1)
3) कवितेचा विषय लिहा. (1)
4) कवितेची मध्यवर्ती कल्पना लिहा. (2)
5) कवितेचा रचना प्रकार लिहा. (1)
6) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे लिहा (2)

**विभाग स्थूलवाचन**

**प्र. 3रा कोणत्याही दोन कृती सोडवा** (6)

1) पुढील संकल्पना स्पष्ट कराः

2) व्हेमिस म्हणजे हि-या–माणकांच्या ढिगासारखा बेटांचा पुंजका

**2) टिपा लिहाः**

1) विश्वकोषाचा उपयोग

**3) तुम्ही पाहिलेल्या, तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही स्थळाचे वर्णन तुमच्या शब्दात करा**

**भाषाभ्यास**

**1) तक्ता पूर्ण करा** (2)

| अ क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| 1) | आईवडील | | |
| 2) | अवती भवती | | |

**2) वाक्य रूपांतरः**

**खालील वाक्यांचे प्रकार ओळखून सूचनेनुसार कृती कराः** (2)

1) तुमचं बाळ खूपच गोंडस आहे. प्रकार ––––

उद्गार वाचक करा––

**2) हे अक्षर खूप चांगले आहे, नाही ?**

आज्ञार्थी करा –

**3) भाषिक खेळ/आकारविल्हे** **(2)**

श्रम श्रमिक सारखे चार शब्द लिहा

**4) अलंकार** **(2)**

**खालील उदाहरण वाचून कृती करा**

फुलपाखरांपरी बागडसी तू चंचलबाला

1) उपमेय –

2) उपमान –

3) साध्यर्मवर्धक शब्द –

4) अलंकार –

**5) सामान्य रूप** (2)

पुढल वाक्यांतील अधोरेखित शब्द वाचून

1) राम मित्राशी बोलतो.

| **शब्द** | **मूळ शब्द** | **प्रत्यय** | **सामान्य रूप** | **विभक्ती** |
|---|---|---|---|---|
| मित्राशी | | | | |

**6) विरामचिन्हे पुढील वाक्ये योग्य विरामचिन्हे घालून लिहा.** (1)

1) पण त्या शब्दांत आई बाबा बहीण बाई हे शब्द होते.

**7) वाक्यप्रचार** **(2)**

कंसातील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.

(घामाघूम होण, चंगळ असणे, जिवाचे रान करणे)

1) लहान मुलांची जत्रेच्या वेळी खायची घ्यायची चैन असते.

2) भर उन्हात कबड्डी खेळताना मुले थकून गेली.

**8) लेखननियमांनुसार लेखनः** **(1)**

सरांनी केलेला उपदेस मी विसरू शकत नाही.

## उपयोजित लेखन

**प्र. 5 वा 1) पत्रलेखन** **(6)**

**पुढील कृतीनुसार पत्र लिहाः**

**दिवाळी सुट्टी –श्रमदानशिबिर**
शिरोळा, कसारा येथे छोटे धरण बांधण्यासाठी कालावधी – 1 आठवडा सहभाग शुल्क रू 100/ (बाकीचा खर्च शाळा करणार)

↓

वडिलांची अनुमती मिळवण्यासाठी पत्रलिहा

**किंवा**

**2) सारांशलेखन**

विभाग – 1 गदय क प्र. क्रमांक 1 मधील अपठित उताऱ्याच्या 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**आ पुढील कृती सोडवा (कोणतेही 2)** **(10)**


**1) संवाद लेखनः**

विद्यार्थ्यांसाठी सूचना
जागतिक पर्यावरणदिनानिमित्त 'आनंदनिकेतन' या वृक्षवाटिकेतर्फे
**वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन**
इच्छुक विद्यार्थ्यांनी २५ एप्रिलपर्यंत वर्गशिक्षकांकडे आपली नावे नोंदवावीत व ५ जूनला सकाळी ७.३० ला शाळेत जमावे.
टीप :- येताना उन्हाळी सुट्टीत जमवलेल्या फळबिया सोबत आणाव्यात.

**वरील सूचना वाचा आणि तुम्ही व तुमची मैत्रिण यांच्यातील संवाद लिहा.**

**2) जाहीरात लेखनः**

**1) पुढील जाहीरात वाचून त्याखालील कृती करा**



**अ) चौकट पूर्ण कराः** **(2)**




**आ) वरील जाहिरात अधिक आर्कषक बनविण्यासाठी तुम्ही कोण – कोणते बदल सुचवाल ? (2)**

**इ) जाहिरातीतील काही मजकूर चूकीचा वाटतो का ? (1)**

**3) कथालेखन :–**

खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा आणि तिला शीर्षकही द्या.

सर्कशीचा तंबू माणसांनी खचाखचा भरला होता. रिना आई – बाबा बरोबर सर्कस पाहण्यास रंगून गेली होती. विदुषकाचे खेळ पाहून माणसे पोट धरून हसत होती.

तेवढयात वाघाची डरकाळी ऐकू आली. रिंगमास्टर वाघाला. घेऊन तंबूत आला होता. वाघाचे सुरू झाले. सर्वजण श्वास रोखून वाघाचे खेळ पाहण्यात गुंग होते.


तेवढयात पिंजऱ्यातून बाहेर येऊन वाघाने अचानक तंबूत उडी मारली. एकच हाहाकार उडाला आणि ––––

**टीप (दिलेली अपूर्ण कथा परिक्षेत पुन्हा लिहिण्याची आवश्यकता नाही)**

**प्र. 6.वा लेखनकौशल्य** **(8)**

**पुढील लेखनप्रकारापैंकी कोणतीही एक कृती सोडवाः**

**1) पुढील कृती सोडवा.**




**2) आत्मकथन**

**2) पुढील घटक (महामार्गावरील सूचनाफलक तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करा व घटकाचे आत्मकथन लिहा.)**

- वाहने हळू चालवा.
- पुढे एक किलोमीटरचा घाट आहे.
- गरज पडेल तेव्हा सतत कर्णभोंगा वाजवा.
- गतिरोधकावर वाहनाची गती कमी करा.
- वाहन चालवताना भ्रमणध्वनी बंद ठेवा.
- लक्षात ठेवा – 'नाहीपेक्षा उशीर बरा.'